# शिक्षण विभाग (प्राथमिक),जिल्हा परिषद पालघर

Email Id :edu.palghar@gmail.com samagrazppalghar@gmail.com

जा.क्र./पाजिप/शिक्षण/प्राथ./आस्था-४/वशी-६८९/२०२४ १३०० दिनांक-०६/१०/ २०२४

विषय:- **अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) १७ संवर्गातील (शिक्षक) सरळसेवेची पदे मानधन तत्वावर भरण्याबाबत.**

सामान्य प्रशासन विभागांकडील शासन निर्णय क्र. बीसीसी-२०२३/प्र. क्र.५४/आरक्षण-५, दि.०५/१०/२०२४ च्या शासन निर्णयामध्ये शासनाने अनुसूचित क्षेत्रात (पेसा) ग्राम पातळीवर काम करणाऱ्या १७ संवर्गातील पदे मानधन तत्वावर भरणेबाबत खालील मुद्यांनुसार मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुसार अनुसूचित क्षेत्रात (पेसा) ग्राम पातळीवर काम करणाऱ्या १७ संवर्गातील (शिक्षक) पद भरतीसाठी कागदपत्र पडताळणी प्रक्रियेमध्ये गुणवत्तेने पात्र ठरलेल्या तालुका व शाळा निश्चित करून देण्यात आलेल्या ७८६ उमेदवारांची यादी संकेतस्थळावर जाहीर करण्यात येत आहे.

**माहे ऑक्टोबर २०२३ मध्ये झालेल्या समुपदेशन प्रक्रियेमध्ये प्रतिक्षाधिन ठेवलेले समाजशास्त्र विषयाचे ३८ व समुपदेशनास गैरहजर राहीलेले ८ अशा एकुण ४६ सोबत जोडलेल्या यादीतील उमेदवारांनी दिनांक- ०८/१०/२०२४ रोजी सकाळी ०९:३० वाजता नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हा परिषद पालघर, दालन क्र.२१२ (बिरसा मुंडा सभागृह), कोळगाव, बोईसर रोड, पालघर (प.), ४०१४०४ येथे समुपदेशनाकरिता वेळेत उपस्थित राहावे.**

उपरोक्त नमुद केलेनुसार यापुर्वी तालुका व शाळा निश्चित करून दिलेले ७८६ उमेदवारांना, प्रतिक्षाधिन व गैरहजर असलेल्या ४६ उमेदवारांना खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाच्या प्रचलित धोरणानुसार मानधन तत्वावर शिक्षक नियुक्ती देण्यात येणार आहे.

तालुका व शाळा निश्चित करून दिलेल्या ७८६ उमेदवारांना त्यांचे मानधन तत्वावरील नियुक्ती आदेश संबंधित तालुक्याच्या पंचायत समिती स्तरावरून दिनांक ०८/१०/२०२४ रोजी दुपारी ०२:०० वाजता वाटप करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

**मानधन तत्वावर नियुक्ती देणेकरिता अटी व शर्ती-**

**१. सदर नेमणुका ह्या शासनाच्या निर्देशाप्रमाणे एकत्रित मानधन तत्वावर देण्यात येणार आहेत.**
**२. मासिक एकत्रित मानधन तत्वावर उमेदवारांची नियुक्ती करताना त्या पदावर प्रथम नियुक्तीच्या वेळी मिळणाऱ्या एकत्रित पगाराइतक्या मानधनावर नियुक्ती करण्यात येईल. सदरची रक्कम ही मानधन असून नियमित वेतन नाही.**
**३. सदरच्या मानधन तत्वावरील नियुक्तीवर उमेदवाराचा कोणत्याही प्रकारचा कायम स्वरूपाचा हक्क असणार नाही.**
**४. मानधन तत्वावर दिलेल्या नेमणूका या मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल असलेल्या विशेष अनुज्ञा याचिका २२१०९/२०२३ च्या अंतिम निर्णयाच्या आधीन राहून देण्यात येणार आहेत.**

(भानुदास पालवे, भा. प्र. से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद पालघर